३४ हजार ७३२ कोटींच्या विकास आराखड्याला गती; सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

गौरी-गणपतीसाठी कोकणात एसटीच्या ५,२२० जादा बसेस धावणार - मंत्री प्रताप सरनाईक >>पान 3

लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण करा- जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे >>पान 4

सुविचार

मेहनतीवर विश्वास ठेवा, नशिबावर नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 24 ■ शनिवार, दि. 08 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006






पाकिस्तानी गायक मुस्तफा जाहिद इमरान हाश्मी स्टारर आवारापन २ साठी तेरा मेरा रिश्ता पुन्हा सादर करणार? आतील पान

## मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गातील उपवर्ग म्हणून विचार करता येईल, राज्य सरकारचा हायकोर्टात दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** अनुसूचित जाती-जमाती तसंच इतर मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षणाचं उपवर्गीकरण करण्यास कायदेशीर मान्यता असल्यानं, त्याच धर्तीवर इतर मागासवर्गीय प्रवर्गात मराठा समाजाचाही उपवर्ग म्हणून विचार केला जाऊ शकतो, असा युक्तिवाद शुक्रवारी राज्य सरकारच्या वतीनं मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आला.

मराठा सामाजाचा ओबीसी उपवर्गात समावेश शक्य - राज्य सरकारच्या वतीनं महाधिवक्ता मिलिंद साठे यांचा सध्या हायकोर्टात युक्तिवाद सुरू आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील विविध निर्णयांचा दाखला देत आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची संकल्पना त्यांनी हायकोर्टात स्पष्ट केली. अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांमध्ये सामाजिक व



शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारे उपवर्ग तयार करण्यास हायकोर्टानं मान्यता दिलीय. त्याच अनुषंगानं मराठा समाजासाठी स्वतंत्र उपवर्ग निर्माण करण्याचा मार्गही उपलब्ध असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

राज्य सरकारनं आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्र सरकारनं लागू केलेल्या १० टक्के आरक्षणाचा दाखला देत ५० टक्के आरक्षणाच्या घटनात्मक मर्यादेचा मुद्दाही यावेळी उपस्थित केला. ईडब्लूएस आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक झालीय. या निर्णयाच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. मात्र, विशिष्ट आणि स्वतंत्र वर्गासाठी घटनात्मक आधारावर ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडेही अपवादात्मक आरक्षण देता येऊ शकतं, असं सर्वोच्च न्यायालयानं याआधीच स्पष्ट केल्याचं त्यांनी यावेळी कोर्टाला सांगितलं.

त्यामुळे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ही प्रत्येक परिस्थितीत पूर्णपणे अपरिवर्तनीय नसून, विशिष्ट घटनात्मक परिस्थितीत त्यापलीकडेही जाण्याची तरतूद कायद्यानं शक्य असल्यानं मराठा आरक्षणालाही त्या तत्त्वाचा आधार मिळू शकतो, या महत्त्वाच्या मुद्द्यावर राज्य सरकारनं मराठा आरक्षणाचं समर्थन करताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं. मुंबई उच्च न्यायालयानं हा युक्तिवाद ऐकून घेत मराठा आरक्षणासंदर्भातील पुढील सुनावणी २ सप्टेंबरपर्यंत तहकूब केलीय.

शुक्रे आयोगानं ऐतिहासिक परिस्थितीचा दिलेला आढावा योग्यच - मराठा समाजाच्या मागासलेपणाच्या प्रश्नावर युक्तिवाद करताना राज्य सरकारनं साल १९५६ पूर्वी मध्य विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये मराठा समाजाला मागास मानलं जात होतं. या दाव्याला सिद्ध करताना त्याबाबतच्या ऐतिहासिक नोंदींचा दाखलाही दिला. या ऐतिहासिक परिस्थितीचा विचार शुक्रे आयोगानं केला होता. त्यामुळे मराठा समाजाच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाबाबत शुक्रे आयोगानं काढलेले निष्कर्ष अगदी योग्य असल्याचा दावाही यावेळी राज्य सरकारनं हायकोर्टापुढे केला.

मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ राज्य सरकारचा जोरदार युक्तिवाद - फेब्रुवारी २०२४ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवत मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा राज्य सरकारनं निर्णय घेतलाय. हे आरक्षण देताना राज्य सरकारनं एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असून घटनाबाह्य मराठा आरक्षण कायदा रद्द करण्यात यावा यासाठी मुंबई उच्च न्यायालयात विविध याचिका करण्यात आल्यात. याशिवाय मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थही हायकोर्टात काही याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानं एक विशेष पूर्णपीठ स्थापन करण्यात आलंय. या याचिकांवर सध्या प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती संदीप मारणे आणि न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या पूर्णपीठासमोर सुनावणी सुरू आहे.

## प्रशांत किशोर यांना राष्ट्रवादीचे राजकीय सल्लागार नेमल्याची माहिती माझ्यापर्यंत नाही; प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** प्रसिद्ध राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी नुकतीच सुनेत्रा पवार यांची घेतलेली भेट आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वर्तुळात सुरू झालेल्या राजकीय चर्चांवर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शुक्रवारी पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. ''प्रशांत किशोर हे आमच्या पक्षासाठी राजकीय सल्लागार म्हणून काम करत आहेत, अशी कोणतीही माहिती माझ्याकडे नाही. जर अशी एखादी नियुक्ती झाली असती, तर प्रदेशाध्यक्ष म्हणून मला ती नक्कीच माहीत असती,'' असे विधान तटकरे यांनी केले. तसेच, पक्षात दोन मतप्रवाह किंवा अंतर्गत मतभेद सुरू असल्याच्या चर्चा या वावड्या असून त्या पूर्णपणे गैरवाजवी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशांत किशोर आणि सुनेत्रा पवार यांच्यातील भेटीनंतर राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सुनील तटकरे यांनी आपली भूमिका सविस्तरपणे मांडली. तटकरे म्हणाले की, ''प्रशांत किशोर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घेतलेली भेट ही औपचारिक होती. आमच्या पक्षात राज्य अथवा केंद्रीय नेतृत्वाला सध्या बाहेरील कोणत्याही राजकीय सल्लागाराची गरज भासलेली नाही. आम्ही जेव्हा 'एनडीए'मध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तो पक्षातील सर्व नेत्यांनी मिळून आणि अत्यंत हिरीरीने घेतला होता. हा निर्णय घेतल्यानंतर महायुतीचे विचार आणि कार्य महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आणि नेत्याने अहोरात्र कष्ट घेतले आहेत. त्या सामूहिक मेहनतीचे फलित म्हणून आपल्याला यश मिळाले आहे. त्यामुळे पक्षात कोणतेही दोन तट किंवा मतप्रवाह निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## रील्ससाठी हवेत गोळीबार अन् थेट तुरुंगाची वाट, १९ वर्षीय तरुणीला अटक

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी** : सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी रील्स बनवण्याचं वेड आता किती धोकादायक ठरू शकतं, याचं धक्कादायक उदाहरण नाशिकमध्ये समोर आलं आहे. मित्राच्या सांगण्यावरून गावठी कट्ट्यातून हवेत गोळीबार करत त्याचा व्हिडिओ बनवणाऱ्या १९ वर्षीय तरुणीला नाशिकरोड पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकरोड परिसरातील सराईत गुन्हेगार भूषण उर्फ स्वप्नील गोसावी याच्याकडे बेकायदेशीर गावठी कट्टा होता. १४ जुलैच्या रात्री त्याने हा कट्टा कोमल रामदास गायकवाड हिला दिला आणि हवेत गोळीबार करण्यास सांगितले. कोमलने कोणताही विचार न करता गोळीबार केला, तर भूषणने संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ आपल्या मोबाइलमध्ये चित्रीत केला.

या घटनेची माहिती गोपनीय बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाल्यानंतर या घटनेचा तपास सुरू करण्यात आला. ५ ऑगस्ट रोजी कोमलला ताब्यात घेण्यात आले. तिचा मोबाइल तपासल्यानंतर हवेत गोळीबार करतानाचा व्हिडिओ आढळून आला. पोलिसांनी विवो कंपनीचा सुमारे २० हजार रुपयांचा मोबाइल आणि चार जीबीचा पेनड्राइव्ह जप्त केला आहे.

## टीसीएस प्रकरण; निदा खानला आश्रय देणाऱ्या एमआयएम नगरसेवकाला न्यायालयीन कोठडी

**संभाजीनगर(औरंगाबाद)** : टीसीएस प्रकरण; निदा खानला आश्रय देणाऱ्या एमआयएम नगरसेवकाला न्यायालयीन कोठडीनाशिक - बहुचर्चित टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धार्मिक भावना दुखावण्यासंबंधित दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजी नगरमध्ये आश्रय दिल्या प्रकरणी एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याला नाशिक पोलिसांनी अटक केली. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

टीसीएस प्रकरणात मुंबई नाका आणि देवळाली कॅम्प या दोन पोलीस ठाण्यात महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धार्मिक भावना दुखावण्यासंदर्भात नऊ गुन्हे दाखल आहेत. यामध्ये प्रमुख संशयित आरोपी म्हणून निदा खान हिचे नाव घेतले जाते. ती पोलिसांच्या हाती लगात नसताना तिने छत्रपती संभाजी नगर येथील एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याच्या मदतीने आश्रय घेतला होता. ज्या घरात निदा आश्रयास होती, त्या घराचे मालक हनिफ खान आणि पटेल यांची विशेष तपास पथकाने जवळपास सात ते आठ तास चौकशी केली. चौकशीअंती उभयंतांचे भ्रमणध्वनी जप्त करण्यात आले. एसआयटी चौकशीत नगरसेवक पटेलने निदाला आश्रय दिल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, मतीन यास न्यायालयाने समन्स बजावले होते. त्यानुसार ३१ जुलै रोजी त्याने न्यायालयात हजर राहणे आवश्यक असताना तो गैरहजर राहिल्याने त्याच्या विरोधात अजामीनपात्र आदेश काढण्यात आले. आदेशाची अंमलबजावणी करत नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री त्याला छत्रपती संभाजी नगर येथुन ताब्यात घेत नाशिकमध्ये आणले. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश केदार जोगळेकर यांच्या न्यायालयात पटेल याच्या वतीने प्रतीक ताजनपुरे यांनी युक्तीवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर पटेल यास १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## भीक नको पण कुत्रा आवर, कर्जमाफीच्या जाचक अटींवरुन राजू शेट्टींचा महायुती सरकारवर घणाघाती आरोप

**पुणे। प्रतिनिधी** : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाच्या संदर्भात आज साखर आयुक्तांची भेट घेतली. यानंतर त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. राज्य सरकारकडून जाहीर झालेल्या पुण्योक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून



पहिल्या यादीत १६ लाख ९६ हजार २०१ शेतकऱ्यांचा समावेश असून त्यांच्यावर लावण्यात आलेल्या अटींवर शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, बड्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज 'राईट ऑफ' करताना असा कोणता बिझनेस आयडी किंवा आधार प्रमाणीकरण मागितले होते? मग शेतकऱ्यांसाठीच एवढ्या अटी का? तुमच्या सर्व निकषांत बसूनही शेतकऱ्यांना अशा तांत्रिक जंजाळात अडकवून ठेवले जात आहे, ज्यामुळे 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी म्हणण्याची पाळी शेतकऱ्यांवर आली आहे, असं यावेळी शेट्टी म्हणाले. यावेळी राजू शेट्टी म्हणाले की, हे सरकार पहिल्यापासून शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळत आलं आहे. ३० जून २०२५ पर्यत थकीत असलेल्या शेतकऱ्यांना पात्र ठरवले आणि आता 'फार्मर आयडी' आणि 'केवायसी' बंधनकारक केले आहे. अनेक पात्र शेतकरी मृत्युमुखी पडले असून त्यांच्या वारसांचे फार्मर आयडी किंवा केवायसी होत नसल्याने ते लाभापासून वंचित राहत आहेत. सरकारने आता भाषणबाजी आणि केवळ याद्या जाहीर करणे बंद करावे व शेतकऱ्यांना कर्जमुक्त झाल्याचे दाखले तात्काळ वाटप करावेत, असं यावेळी शेट्टी म्हणाले.

''साखर आयात करण्याचा मूर्खपणा करू नका'' : ते पुढे म्हणाले की, दिवाळी आणि गणपती उत्सव तोंडावर आल्याने साठेबाजांनी साखरेचे भाव वाढवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र व राज्य सरकारमधील उच्चपदस्थांच्या आजूबाजूलाच हे साठेबाज फिरत आहेत. साखर कारखान्यांची साखर गोळा करून ती महागड्या दराने विकायची आणि ऑक्टोबरनंतर साखर आयातीचा निर्णय घ्यायचा, जेणेकरून तोपर्यत या साठेबाजांनी हजारो कोटी कमवावेत, असा हा डाव आहे. याप्रकरणी केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना भेटून 'साखर आयात करण्याचा मूर्खपणा करू नका' अशी विनंती पत्रव्यवहाराद्वारे करणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलं.

## सुषमा स्वराज या अष्टपैलू प्रतिभावंत राजकारणी : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना 'अग्निशिखा सुषमा स्वराज' या हिंदी अनुवादित पुस्तकाची पहिली प्रत भेट देण्यात आली. डॉ. मेधा सोमय्या यांनी मूळ मराठीत लिहिलेल्या या पुस्तकाचा हिंदी अनुवाद अमरजीत मिश्र यांनी केला आहे. सुषमा स्वराज या अष्टपैलू प्रतिभावंत राजकारणी होत्या. आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत भूषविलेल्या प्रत्येक पदावर त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला होता, असे उद्गार राज्यपालांनी याप्रसंगी काढले.




सुषमा स्वराज या अमोघ वक्त्या होत्या; उत्कृष्ट संसदपटू होत्या; लढवय्या विरोधी पक्ष नेत्या आणि कार्यक्षम मंत्री होत्या. आज समाजाला त्यांच्यासारख्या समकालीन आदर्श व्यक्तिमत्वाची (रोल मॉडेल) गरज आहे असे राज्यपालांनी सांगितले. स्वराज यांनी केलेले संस्कृत मधील एक भाषण इतके अस्खलित आणि विद्वत्ता प्रचुर होते की संस्कृतच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी ते ऐकावे. आपण विद्यापीठांना सुषमा स्वराज यांचे ते भाषण संस्कृत विद्यार्थ्यांसाठी ऐकण्यास उपलब्ध करण्याची शिफारस करु असेही त्यांनी सांगितले.

उत्तर पूर्वेकडील राज्यात पक्ष संघटन कमजोर होते. सुषमाजी मात्र कार्यकर्त्यांच्या निमंत्रणावरून आवर्जून उत्तर पूर्वेकडील राज्यांना भेट द्यायच्या. भाषणाला जाण्यापूर्वी त्या स्थानिक भाषेतील शब्द, वाक्य समजून घ्यायच्या व भाषणात वापरायच्या. त्यामुळे त्या उत्तर पूर्वेत अतिशय लोकप्रिय होत्या असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी लेखिका डॉ. मेधा सोमैया व अनुवादक अमरजीत मिश्र यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. किरीट सोमय्या, नगरसेवक डॉ. नील सोमय्या, मुंबईचे माजी उपमहापौर अरुण देव तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.




## 'हर घर तिरंगा' अभियान यशस्वी करा - जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : देशभरात दि. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येणार आहे. हा अभियान उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि व्यापक लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करून सोपविलेल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विभागप्रमुखांच्या जिल्हास्तरीय बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नगर विकास विभाग जिल्हा सह आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्राथमिक, सर्व तहसीलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख ऑनलाइनद्वारे उपस्थित होते.

बैठकीत अभियानाच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यंदाचे अभियान 'वंदे मातरम्' गीताच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ समर्पित असून, त्यानिमित्त जिल्हाभर सामूहिक वंदे मातरम् गायन, प्रभात फेऱ्या, बाईक रॅली, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी विविध स्तरांवर प्रभावी जनजागृती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रध्वजाचा सन्मान, त्याचा योग्य वापर आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध स्पर्धा व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याच्या सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या. शासकीय



कार्यालये, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संघटना तसेच नागरिकांनी मोठ्या उत्साहाने अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांची प्रभावी आणि शिस्तबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विभागाने परस्पर सहकार्याने काम करावे, असे निर्देश दिले.तसेच अभियानाच्या कालावधीत भारताच्या ध्वज संहितेचे पालन करून राष्ट्रध्वजाचा योग्य सन्मान राखावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चिपनिर्मितीत भारताची झेप

भारताने २०२१ मध्ये देशात 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन'ची अधिकृत सुरुवात केली होती. आता या महत्त्वाकांक्षी मोहिमेला प्रभावी आयाम दिला गेला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच 'सेमीकंडक्टर मिशन २.०' ला अत्यंत महत्त्वपूर्ण मंजुरी दिली असून, यासाठी तब्बल १.२७ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड रकमेची भरीव खात्रीशीर तरतूद केली गेली आहे. आपण यापूर्वीच्या ७६,००० कोटी रुपयांच्या मूळ कार्यक्रमाचा विचार केला, तर हा नवीन टप्पा त्याहून कितीतरी पटीने अधिक मोठा, विस्तृत आणि सर्वसमावेशक आहे. सरकारच्या या नव्या आणि विशाल धोरणाचा मुख्य उद्देश हा केवळ भारतात चिप्सचे फॅब्रिकेशन किंवा उत्पादन सुरू करणे एवढाच मर्यादित नाही, तर यामध्ये चिप्सची डिझाईन तयार करण्यापासून ते थेट त्यांचे शेकडो प्रकारांत परीक्षण, पॅकेजिंग, त्यासाठी लागणारी रसायने, विशिष्ट मशिनरी, संशोधन आणि या संपूर्ण क्षेत्रासाठी अत्यंत कुशल मानवी संसाधन तयार करून एक परिपूर्ण सेमीकंडक्टर पुरवठा साखळी भारतातच निर्माण करणे हा आहे. डिसेंबर २०२१ मध्ये जेव्हा याची पहिली पायाभरणी झाली होती, तेव्हा जगभरात सेमीकंडक्टरची प्रचंड टंचाई होती. वाहन उद्योगापासून ते अगदी सामान्य इलेक्ट्रॉनिक्स आणि मोबाईल कंपन्यांपर्यंत सर्वांचेच उत्पादन या भीषण टंचाईमुळे विस्कळीत झाले होते. काही मोजके देशच सेमीकंडक्टरचे मोठे उत्पादक असल्यामुळे संपूर्ण जग पूर्णपणे त्यांच्याच कृपेवर आणि पुरवठ्यावर अवलंबून होते. याच ऐतिहासिक पेचप्रसंगातून मार्ग काढत भारत सरकारने भविष्यात कधीही अशा संकटाचा सामना करावा लागू नये म्हणून देशातच चिप उत्पादनाचा पाया रचण्याची मोहीम हाती घेतली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, या संपूर्ण मिशनचा मूळ उद्देश हा केवळ देशांतर्गत गरज भागवणे हा नसून, भारत देशाला जागतिक स्तरावर सेमीकंडक्टर उत्पादनाची अत्यंत महत्त्वाची आणि भक्कम महाशक्ती बनवणे हा आहे. सेमीकंडक्टर इंडिया १.० च्या पहिल्या टप्प्याला भारतामध्ये अभूतपूर्व आणि दमदार यश मिळाले. गुजरात, उत्तर प्रदेश, पंजाब, आसाम, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये आतापर्यंत जवळपास १२ मोठ्या सेमीकंडक्टर प्रकल्पांना अधिकृत मंजुरी दिली आहे. यामध्ये सिलिकॉन फॅब्र, डिस्प्ले फॅब्र, कंपाऊंड सेमीकंडक्टर, पॅकेजिंग आणि इतर अत्यंत उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व अनुमोदित प्रकल्पांच्या माध्यमातून भारतामध्ये एकूण १.६४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची विक्रमी गुंतवणूक केली जात आहे. टाटा समूह गुजरातच्या धोरणात्मक क्षेत्रामध्ये देशातील सर्वात पहिली आधुनिक सेमीकंडक्टर फॅब्र उभारण्याचे ऐतिहासिक काम करत आहे. याशिवाय, अमेरिकेच्या प्रसिद्ध क्येन्स सेमीकंडक्टर कंपनीनेदेखील आसाममध्ये आपले नवीन सेमीकंडक्टर युनिट उभारण्यासाठी पावले उचलली आहेत. तज्ज्ञांच्या मते, येत्या २०२६ च्या उत्तरार्धापर्यंत या सर्व प्रकल्पांमधून प्रत्यक्ष व्यावसायिक उत्पादन सुरू होईल, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे. या संपूर्ण प्रवासात आता सुरू झालेला 'सेमीकंडक्टर इंडिया २.०' हा नवीन टप्पा पूर्वीच्या तुलनेत अधिक महत्त्वाकांक्षी आणि व्यापक आहे. सरकारच्या मते, पहिल्या टप्प्याचा उद्देश भारताला केवळ एक फॅब्रिकेशन हब बनवण्याचा होता; परंतु आता दुसऱ्या टप्प्यात सरकारला संपूर्ण सप्लाय चेनमध्ये जागतिक पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवायचे आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन यांनी स्पष्ट केले आहे की, आता केवळ फॅक्टरी लावण्यापुरते मर्यादित न राहता, चिप डिझाईन, निर्माण, डव्हान्स्ड पॅकेजिंग, संशोधन, उपकरणनिर्मिती आणि उच्च दर्जाची प्रतिभा विकसित करून एक मजबूत औद्योगिक परिसंस्थेचे जाळे निर्माण करावे लागणार आहे. नव्या धोरणामुळे भारताला हार्डवेअर निर्मितीचे केंद्र बनवण्याबरोबरच जागतिक स्तरावर डिझाईन सेवा पुरवणारे एक प्रमुख बौद्धिक संपत्ती (आयपी) आधारित ठिकाण बनवण्याचे मोठे ध्येय ठेवले आहे. सरकारचे असे स्पष्ट मत आहे की, भारतीय कंपन्यांनी स्वतःचे डिझाईन केलेले प्रोसेसर, मायक्रोकंट्रोलर आणि विशेष उपयोगासाठी लागणाऱ्या चिप्स विकसित केल्या पाहिजेत, ज्यांचा उपयोग अंतराळ, दूरसंचय, ऑटोमोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या अत्यंत संवेदनशील क्षेत्रांमध्ये होऊ शकेल. याद्वारे विदेशी तंत्रज्ञानावर असणारी भारताची जुनी मदार पूर्णपणे संपुष्टात येईल आणि देशातील उदयोन्मुख कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सुवर्णसंधी उपलब्ध होईल. या संपूर्ण धोरणाचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे आता सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी लागणाऱ्या मशिनरी, विविध प्रकारची रसायने आणि विशेष वायूदेखील भारतातच उत्पादित केले जाणार आहेत. सेमीकंडक्टरच्या निर्मितीसाठी केवळ फॅब्रिकेशन युनिटस् चालवणे पुरेसे नसते, तर त्यासाठी अतिशुद्ध सिलिकॉन वेफर, स्पेशल गॅसेस, फोटोरेसिस्ट, सिलिकॉन वेफर आणि इतर अनेक रासायनिक सामग्रीची नितांत आवश्यकता असते. आतापर्यंत या सर्व गोष्टींसाठी भारत प्रामुख्याने कोरिया, तायवान, जपान आणि अमेरिका यांसारख्या देशांवर पूर्णपणे अवलंबून होता; परंतु 'सेमीकंडक्टर इंडिया २.०' अंतर्गत या कच्च्या मालाच्या उत्पादनाला देशातच प्रोत्साहन दिले जात आहे, ज्यामुळे भारताची जागतिक पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल आणि परदेशी चलनाची मोठी बचतदेखील साधता येईल. या संपूर्ण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सरकारने डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह (डीएलआय) योजनेअंतर्गत स्टार्टअप्स आणि एमएसएमई प्रकल्पांना भरभक्कम आर्थिक मदत आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक डिझाईन ऑटोमेशन (ईडीए) टूल्स विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे आता देशातील लहान स्टार्टअप्स आणि तरुण अभियंते स्वतःच्या अत्याधुनिक चिप्स आणि सिस्टीम ऑन चिप डिझाईन करू शकत आहेत. याशिवाय, स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशातील ३१५ हून अधिक विद्यापीठांमध्ये सेमीकंडक्टर डिझाईनचे प्रशिक्षण आणि उद्योग स्तरावरील व्यावसायिक सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध करून दिले गेले आहेत. मोहाली येथील सेमीकंडक्टर लॅबचे आधुनिकीकरण केले जात असून, तेथे हजारो विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रत्यक्ष चिप्सची चाचणी आणि प्रोटोटाईप तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. भारताने या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली असली, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हाने अद्याप पूर्णपणे संपलेली नाहीत. तज्ज्ञांच्या मते, केवळ आर्थिक सहाय्य देऊन या स्पर्धेत टिकून राहणे शक्य होणार नाही.

# ३४ हजार ७३२ कोटींच्या विकास आराखड्याला गती; सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कुंभमेळ्याच्या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही; विभागांनी जबाबदारीने काम करा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :**नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तारीख निश्चित असून, सर्व विभागांनी विकास आरखड्यातील कामे नियोजित वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत. कामे पुढे ढकलण्याची वृत्ती दूर करुन कुंभमेळ्याच्या ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या विकास आरखड्यातील कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, सरोज अहिरे, हिरामण खोसकर, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याची कुंभमेळ्यातील कामांची परिस्थिती समाधानकारक नसून प्रत्येक विभागाने अधिक वेगाने आणि समन्वयाने काम करण्याची गरज आहे. बैठकीत देण्यात आलेल्या सर्व सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी. एक महिन्यानंतर पुन्हा आढावा बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीपर्यंत कामामध्ये गुणात्मक आणि प्रत्यक्ष प्रगती दिसली पाहिजे. त्यामुळे पुढील बैठकीची तयारी आजपासूनच सुरू करावी.

**विविध विभागांमध्ये समन्वय असणे आवश्यक**

मुख्यमंत्री म्हणाले की, विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे कोणतेही काम रखडता कामा नये. सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम करून कुंभमेळ्याची तयारी वेळेत पूर्ण करावी. नाशिक महानगरपालिका आयुक्तांनी नाशिकमधील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची आणि रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी गती देण्याचे निर्देश दिले. निर्धारित वेळेत कामे न करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करावी. विकास कामांचा नागरिकांना त्रास होऊ नये, याची खबरदारी यंत्रणांनी घ्यावी.

महानगर गॅस कंपनीने गॅस जोडणीच्या कामांसाठी नाशिक महानगरपालिकेशी समन्वय साधून प्रलंबित गॅस कनेक्शनची कामे तातडीने पूर्ण करावीत. सिंहस्थ कुंभमेळा हा राज्याच्या प्रतिष्ठेचा विषय असून, सर्व विभागांनी वेळबद्ध नियोजन, परस्पर समन्वय आणि जबाबदारीची जाणीव ठेवून काम करावे तसेच कुंभमेळ्याची तयारी वेळेत पूर्ण होईल यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत १२ कोटी भाविकांच्या सुरक्षित व सुलभ दर्शनासाठी वाहतूक, निवास, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन आणि डिजिटल सुविधा याबाबत सविस्तर नियोजन सादर करण्यात आले, त्याबाबत ते म्हणाले, नाशिक रिंग रोड, साधुग्राम उभारणी, रेल्वे स्थानकांचा विकास, ४,५०० विशेष एसटी बसेस तसेच विस्तृत पार्किंग व्यवस्थेची कामे गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'डिजिटल कुंभ' संकल्पनेअंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, 'कुंभदूत' एआय सहाय्यक, डिजिटल ट्विन, स्मार्ट पार्किंग, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, तसेच एकात्मिक कमांड अँड कंट्रोल




सेंटरच्या माध्यमातून गर्दी आणि सुरक्षा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचे निर्देश दिले.

कुंभमेळा स्वच्छ, हरित आणि प्लास्टिकमुक्त करण्यासाठी हजारो तात्पुरती शौचालये, कचराकुंड्या, बदल खोल्या आणि मोठ्या प्रमाणात स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. आपत्ती व्यवस्थापनासाठी विशेष पथके, स्वयंसेवक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही करण्यात येणार आहे. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत असून हजारो युवकांना पर्यटन, आदरातिथ्य, आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच सूक्ष्म उद्योजकांना व्यवसाय वृद्धीसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी भूसंपादन, रिंग रोड, साधुग्राम आणि इतर महत्वाच्या नागरी सुविधा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करून एप्रिल २०२७ मध्ये प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध करण्याचे निर्देश दिले. केंद्र व राज्य शासन, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम करून सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित, भव्य आणि भाविकांसाठी संस्मरणीय करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीला नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिकचे सिंहस्थ कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनिषा खत्री, नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यासह नाशिकचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# एमडींना अण्णासाहेब पाटील महामंडळाचे वाटोळे करण्याची सुपारी; नरेंद्र पाटील यांचा गंभीर आरोप, अध्यक्षपद सोडण्याचे संकेत

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** : मराठा समाजासाठी असलेले अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचं व्यवस्थापकीय संचालक विजयसिंग देशमुख यांनी वाटोळं केल्याचा आरोप महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केला. हा व्यवस्थापकीय संचालक सरकारला अडचणीत आणत आहे, मराठा समाजाचे नुकसान करत आहे, असे आरोप नरेंद्र पाटील यांनी केले आहेत. सरकारला बदनाम करण्याचं काम हा अधिकारी करत असून त्याची तक्रार आपण मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचंही नरेंद्र पाटील म्हणाले.

महामंडळाच्या अध्यक्षाकडे काही अधिकार नाहीत, आमचे हात बांधले असल्याचं नरेंद्र पाटील म्हणाले. तसेच नरेंद्र पाटील यांनी महामंडळाचे अध्यक्षपद सोडण्याचे संकेत दिले आहेत.

एक व्यवस्थापकीय संचालक



शासनाचे नुकसान करत असेल तर शासनाने त्यावर कारवाई करण्याची गरज असल्याचं नरेंद्र पाटील म्हणाले. यांच्या पाठीशी कुणीतरी आहे, त्यांना शासनाला यांच्या माध्यमातून बदनाम करायचे आहे असाही आरोप नरेंद्र पाटील यांनी केला. एमडीने प्रमाणपत्र देताना अटी सांगितल्या, कर्ज देताना उत्पन्नाची अट घातली. या अटीशर्तीमुळे मराठा समाज मागे पडला, असं नरेंद्र पाटील म्हणाले.

एमडीच्या मनमानी कारभाराचा फटका मराठा समाजाला बसला असून त्यामुळे अनेकांना कर्ज मिळू शकले नाही. २०२४-२५ साली अनेक प्रमाणपत्रं रद्द करण्यात आली. शासनाच्या विरोधात लोकांमध्ये रोष निर्माण करण्याचे काम महामंडळाचे एमडी करत आहेत. या मुळे मराठा समाज नाराज झाला आहे. याबाबत मराठा समाजाने मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीची मागणी केली आहे.

विजयसिंग देशमुख हे एमडी आहेत, त्यांना सरकारला अडचणीत आणण्यासाठी कुणीतरी सुपारी दिली असल्याचं आम्हाला वाटतंय. याबाबत आपण मुख्यमंत्री आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तक्रार केली आहे, अशी माहिती नरेंद्र पाटील यांनी दिली.

महामंडळाचे एमडी अध्यक्षाला विचारात न घेता काम करतात हे स्पष्ट आहे. अध्यक्षपद आता शोभेचे राहिले आहे याचे आम्हाला वाईट वाटतंय. आमचे हात बांधले आहेत, हे पद ठेवून करू काय? मी आता महामंडळाची सेवा वापरात नाही, त्यामुळं आता मला पद सोडावे लागेल असे दिसतेय, असं नरेंद्र पाटील म्हणाले.

## पाकिस्तानी गायक मुस्तफा जाहिद इमरान हाश्मी स्टारर आवारापन २ साठी तेरा मेरा रिश्ता पुन्हा सादर करणार ?

दैनिक आपला विदर्भ

हैदराबाद : अभिनेता इमरान हाश्मीच्या चित्रपट 'आवारापन'मधील प्रचंड लोकप्रिय 'तेरा मेरा रिश्ता' हे गाणं गाणारे पाकिस्तानी गायक मुस्तफा झाहिद, या गाण्याचा रिमेक रेकॉर्ड करण्यासाठी पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत, असे मीडिया रिपोर्ट्समध्ये म्हटलं आहे. असं म्हटलं जात आहे की, पाकिस्तानी गायक मुस्तफा झाहिद हे गाणं गाईल. जर वाटाघाटी यशस्वी झाल्या, तर हा गायक चित्रपटातील सर्वात लोकप्रिय आणि हिट असलेल्या या गाण्यात परत येऊ शकतो, मात्र सध्या भारतात पाकिस्तानी कलाकारांवर बंदी आहे.

दोन्ही पक्षांकडून मंजुरी मिळणे बाकी : माध्यमांच्या वृत्तानुसार, झाहिद निर्माते मुकेश भट्ट आणि विशेष भट्ट यांच्याशी बोलणी करत आहेत आणि जर हा करार निश्रि्चत झाला, तर या आठवड्यात दुबईमध्ये रेकॉर्डिंग सुरू होऊ शकते. हे गाणे सीक्केलमध्ये समाविष्ट करण्याचा विचार नाही, कारण त्याच्या समावेशामुळं प्रमाणपत्राच्या समस्या निर्माण होऊ शकतात. चित्रपट निर्माते हे गाणे चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्याऐवजी केवळ सोशल मीडिया प्रमोशनसाठी वापरण्याचा विचार करत आहेत. सध्या दोन्ही पक्षांकडून मंजुरी मिळणे बाकी आहे.

'आवारापन' चित्रपटाबद्दल : दरम्यान २०२६च्या उरी दहशतवादी हल्ल्यापासून हिंदी चित्रपटसृष्टीत पाकिस्तानी कलाकारांवर बंदी घालण्यात आली आहे. २०२५च्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी कलाकारांना भारतात काम करू द्याचे नाही याबद्दल चर्चा होत्या. २००७ साली प्रदर्शित झालेला 'आवारापन' हा चित्रपट त्याच्या उत्कट प्रेमकथेसाठी आणि चार्टवर अव्वल ठरलेल्या संगीतासाठी आजही लोकप्रिय आहे. या चित्रपटातील 'तेरा मेरा रिश्ता' हे एक सदाबहार गाणे आहे. 'आवारापन'ची निर्मिती सुरू असल्यानं, हा सीक्केल मूळ चित्रपटाचा संगीताचा वारसा पुन्हा जिवंत करेल की नाही, याबद्दलच्या चर्चांना जोर चढला आहे. या आगामी सीक्केलमध्ये इमरान हाश्मी शिवम पंडितच्या भूमिकेत असून, त्याच्याबरोबर दिशा पटानी, शबाना आझमी, सुविंदर विकी, विजयंत कोहली, अनिरुद्ध रावल आणि अतुल कुमार यांच्याही भूमिका आहेत.

# शेगावात गजानन दर्शन, खामगावात महत्त्वाचे कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : देशाची राजधानी असलेल्या दिल्ली येथील जंतर मंतर येथे 'झेन -जी 'चे यशस्वी आंदोलन विविध अर्थाने गाजले. त्याचे पडसाद अजूनही देशभरात उमटत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी काल गुरुवारी तरुणाई शी अर्थात दोन हजार युवकांशी संवाद साधला. या संवादावर उलट सुलट प्रतिक्रिया उमटत असताना सरसंघचालक मोहन भागवत हे बुलढाणा जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आले आहेत.

**संतनगरीतून दौऱ्यास प्रारंभ**

ते आजपासून दोन दिवसीय शेगाव आणि खामगाव दौऱ्यावर आहेत. दौऱ्याच्या सुरुवातीलाच सरसंघचालक मोहन भागवत यांनी विदर्भ पंढरी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात जाऊन श्रींच्या समाधीचे दर्शन घेतले आणि चरणी नतमस्तक झाले. यावेळी मंदिर प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. वारकऱ्यांच्या उपस्थितीत टाळ-मृदुंगाच्या गजरात अत्यंत भक्तिपूर्ण वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मोहन भागवत यांनी मंदिर प्रशासनाकडून संस्थानच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

**कडक बंदोबस्तात सकाळी आगमन**

तत्पूर्वी, आज शुक्रवारी सकाळी ६ वाजताचे सुमारास हावडा एक्सप्रेसने सरसंघचालकांचे संत नगरी शेगावमध्ये आगमन झाले. रेल्वे स्थानकावर स्वयंसेवकांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. त्यानंतर त्यांनी संघाच्या एका स्थानिक कार्यकर्त्याच्या निवासस्थानी भेट देऊन अल्पोपहार घेतला. सरसंघचालकांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेगाव आणि परिसर क्षेत्रात पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला.

**खामगावात दाखल**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे आज आणि उद्या अशा दोन दिवसीय बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आले आहेत. उद्या, ८ ऑगस्टला खामगाव येथील ऋषी संकुल परिसरात सूर्योदय



पारधी समाज आश्रम शाळेत त्यांचे हस्ते नवीन बंदिस्त सभागृह आणि क्रीडा संकुलचे उद्धाटन होणार आहे. आज शेगाव दर्शनानंतर आज शुक्रवारी सकाळी ११ वाजता सरसंघचालक मोहन भागवत यांचे कारने खामगावात आगमन झाले. यावेळी खामगाव शेगाव मार्गावर ठिकठिकाणी तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

खामगावात तालुका संघचालक संतोष देशमुख यांच्या निवासस्थानी आज सरसंघचालक भागवत यांचा मुक्काम असणार आहे. आज दिवसभरात संघाच्या कार्यकर्त्यांच्या विविध बैठका होणार आहेत. उद्या, सकाळी साडेदहा वाजता ऋषी संकुल परिसरात सूर्योदय पारधी समाज आश्रम शाळेच्या कार्यक्रमाला मोहन भागवत उपस्थित राहणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गौरी-गणपतीसाठी कोकणात एसटीच्या ५,२२० जादा बसेस धावणार - मंत्री प्रताप सरनाईक

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी :** श्री गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सज्ज झाले आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाने यंदा ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत ५,२२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासंदर्भात एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच एसटीचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या भावविश्र्वाशी घट्ट जोडलेला सण आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नफा-तोट्याचा विचार न करता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सज्ज आहे. यंदा सुमारे ५,२२० जादा बसेस कोकणातील विविध मार्गांवर धावणार आहेत.

या जादा बसेसचे आरक्षण npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रवाशांना बसस्थानकांवर तसेच MSRTC Bus Reservation या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही आरक्षण करता येणार आहे. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, नुकत्याच पार पडलेल्या आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. त्या सेवेला भाविक व प्रवाशांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर गणेशोत्सवासाठीही मोठ्या प्रमाणावर जादा बसेस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**१० ऑगस्टपासून गट आरक्षणास प्रारंभ**

किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडे सवलत लागू राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ७ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातील प्रमुख बसस्थानकांतून या जादा बसेसचे संचालन करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या काळात एसटीची वाहतूक सुरळीत राहावी यासाठी सर्व प्रमुख बसस्थानके आणि बसथांब्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहतील. तसेच कोकणातील प्रमुख महामार्गांवर आवश्यक त्या ठिकाणी वाहनदुरुस्ती पथके तैनात करण्यात येणार असून, प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि अखंड सेवा देण्यासाठी सर्वतोपरी व्यवस्था करण्यात आली आहे.

## ताथवडेत एकाच संकलनातून ४ मुऱ्हा रेडकांचा जन्म; दुग्ध व्यवसायात मोठी क्रांती

**मुंबई । प्रतिनिधी :** अत्याधुनिक भ्रूण हस्तांतरण व आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुऱ्हा जातीच्या ३ मादी व एन नर, अशा चार निरोगी रेडकांचा यशस्वी जन्म झाला आहे. राज्यातील म्हैस संवर्धन व उच्च आनुवंशिक क्षमतेच्या पशुधन निर्मितीच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. हे तंत्रज्ञान राज्यातील दुग्ध उत्पादन क्षेत्रात नव्या क्रांतीची नांदी ठरणार आहे.

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत कार्यरत पुण्यातील ताथवडे येथील ईटी-आयव्हीएफ प्रयोगशाळा व शासकीय पशुपैदास प्रक्षेत्रात या प्रयोग यशस्वीपणे पार पडला. यासाठी वाकज येथील स्वप्नील कलाटे यांच्या उच्च दुग्ध उत्पादक मुऱ्हा म्हशीचा दाता (डोनर) म्हणून वापर करण्यात आला होता.

एका स्त्रीबीज संकलन सत्रात एकूण १७ अंडपेशी (ओसाइट्स) संकलित करण्यात आल्या. त्यापैकी ५ उच्च दर्जाचे भ्रूण ताथवडे येथील भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळेत विकसित करण्यात आले. हे पाचही भ्रूण शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथील दाई म्हशींमध्ये प्रत्यारोपित करण्यात आले. त्यापैकी ४ म्हशी गर्भधारणा करण्यात यशस्वी ठरल्या व त्यांपासून ३ मादी व १ नर अशा एकूण चार निरोगी मुऱ्हा रेडकांचा जन्म झाला.

या संपूर्ण प्रक्रियेत स्त्रीबीज संकलन ते भ्रूण प्रत्यारोपणाची सर्व तांत्रिक प्रयोगशाळेतील राज्य नोडल अधिकारी डॉ. विष्णू जवणे यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली. सहाय्यक आयुक्त डॉ. रतिकांत नवटके यांनी दाई म्हशींसाठी आवश्यक असलेली आरोग्य तपासणी व माज नियमनाचे काम पाहिले. या प्रकल्पाची अंमलबजावणी शासकीय गोठीत रेत निर्मिती केंद्र खडकी, पुणे येथील विभागीय व्यवस्थापक डॉ. उदय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

उच्च आनुवंशिक क्षमतेच्या म्हशींची जलद निर्मिती, उत्कृष्ट दुग्ध उत्पादन क्षमता असलेल्या पशुधनाचा प्रसार व राज्यातील दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हे तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी एक मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला.

## अत्याधुनिक आरोग्य सुविधा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यास शासन कटिबद्ध : मंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार व अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून आरोग्य सुविधांचा विस्तार ही काळाची गरज आहे, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी अंतर्गत परळ येथील महात्मा गांधी मेमोरियल हॉस्पिटलसह राज्यातील १० नव्याने सुरू करण्यात आलेल्या दंत शल्यक्रिया विभाग आणि नवजात शिशु अतीव दक्षता विभागाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, आरोग्य सेवा ही केवळ उपचारापुरती मर्यादित नसून ती समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी आहे. प्रत्येक रुग्णाला सन्मानाने, संवेदनशीलतेने आणि गुणवत्तापूर्ण सेवा मिळाली पाहिजे. डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच निरोगी समाजाची उभारणी शक्य आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम मनुष्यबळ आणि दर्जेदार आरोग्य सेवा यांच्या माध्यमातून उपचार व्यवस्था अधिक प्रभावी करण्याचे काम सुरू आहे. नव्याने सुरू झालेले दंत शल्यक्रिया विभाग आणि नवजात शिशु अतीव दक्षता विभाग हे रुग्णांसाठी मोठे वरदान ठरणार असून विशेषतः नवजात बालकांना तातडीचे आणि गुणवत्तापूर्ण उपचार स्थानिक स्तरावर उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तसेच उत्तर प्रदेशच्या धर्तीवर राज्यातील सर्व रुग्णालयातील सर्व माहिती १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री आबिटकर यांनी आरोग्य सेवा बजावणारे विविध विभाग, डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी आणि सेवाभावी संस्थांच्या योगदानाचे कौतुक केले. समाजहितासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास आरोग्य क्षेत्रात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते, असे सांगत त्यांनी ऑनलाइन माध्यमातून कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांचेही आभार मानले.

आमदार सीमाताई हिरे (यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे) आणि आमदार चित्रा वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी राज्य कामगार विमा सोसायटीचे संचालक अशोक थोरात यांनी प्रास्ताविक करून नव्या विभागांची माहिती दिली. या सोहळ्याचे दूरदृष्य प्रणालीद्वारे उद्घाटन वरळी, कांदिवली, मुलुंड, वाशी, पुणे, नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील रुग्णालयांशी जोडून करण्यात आले. कार्यक्रमास राज्य कामगार विमा सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी फाळके, नगरसेवक किरण तावडे तसेच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुगल मॅप्समध्ये नवं अपडेट: आस्क मॅप्स बोलणार हिंदीत, भारतात रिअल-टाइम ट्रान्झिट

**मुंबई । प्रतिनिधी :** गुगलनं आपल्या मॅप्स ॲपमधील जेमिनी-आधारित नैसर्गिक भाषेतील प्रश्न विचारण्याच्या 'आस्क मॅप्स' या वैशिष्ट्यासाठी नवीन अपडेट्सची घोषणा केली. मूळतः मार्चमध्ये सादर करण्यात आलेल्या या फीचरमध्ये आता लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या आहेत, ज्यात हिंदी भाषेचा सपोर्ट, रिअल-टाइम सार्वजनिक वाहतूक माहिती आणि वैयक्तिकृत शिफारसी यांचा समावेश आहे. गुगलनं याला गेल्या दशकातील मॅप्समधील सर्वात मोठा बदल म्हटलं आहे, ज्यामुळं वापरकर्त्यांना अधिक सहजपणे आणि संदर्भानुसार माहिती मिळवणे शक्य होईल.

आस्क मॅप्स आता हिंदीला सपोर्ट करतं, मागील संवाद लक्षात ठेवतं आणि वैयक्तिक माहितीच्या आधारावर शिफारसी देतं. गुगलच्या एका ब्लॉग पोस्टनुसार, वापरकर्ते आता इंग्रजीसोबतच हिंदीमध्येही प्रश्न विचारू शकतात, ठिकाणे शोधू शकतात आणि नैसर्गिक भाषेत शिफारसी मिळवू शकतात. यामुळं भारतातील मोठ्या वापरकर्ता वर्गासाठी मॅप्स वापरणे अधिक सोपं होणार आहे.

या अपडेटमध्ये एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'पर्सनल इंटेलिजन्स'. फोटोज, ड्राईव्ह आणि इतर गूगल ॲप्सप्रमाणेच, मॅप्सला आता जीमेल खात्याशी जोडता येतं. यामुळं हे ॲप हॉटेल बुकिंग, फ्लाइटचा तपशील आणि रेस्टॉरंट आरक्षणासारख्या माहितीच्या आधारे संदर्भानुसार शिफारसी देऊ शकतं. उदाहरणार्थ, ते नियोजित फ्लाइटपूर्वी जवळपासची आकर्षणे सुचवू शकतं किंवा बुक केलेल्या हॉटेलजवळ भेट देण्यासारख्या ठिकाणांची शिफारस करू शकतं. हे जीमेल इंटिग्रेशन डीफॉल्टनुसार अक्षम केलेलं आहे आणि वापरकर्त्याला ते स्वत:हून सक्षम करावं लागतं.

आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे 'कन्व्हर्सेशनल मेमरी'. जर हिस्ट्री सेटिंग्ज सक्षम केली असतील, तर आस्क मॅप्स मागील चॅट्स लक्षात ठेवेल. यामुळं सहलीचे नियोजन पुन्हा सुरू करणे किंवा पूर्वीच्या शिफारसी पुन्हा पाहणे सोपे होतं.

## आता बॉम्ब बनवण्याची माहिती देणारी पुस्तके, दहशतवादी संघटनांच्या प्रचार साहित्यावर महाराष्ट्रात बंदी; गृहविभागाकडून शासन निर्णय जारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** तरुणांना कट्टर विचारसरणीकडे वळवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जहाल साहित्याविरोधात महाराष्ट्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. बॉम्ब तयार करण्याची माहिती देणारी पुस्तके, दहशतवादी संघटनांचा प्रचार करणारी मासिके, ऑनलाइन माध्यमातून प्रसारित होणारे डिजिटल साहित्य आणि इतर आक्षेपार्ह सामग्रीवर राज्य सरकारने बंदी घातली असून, हे साहित्य जप्त करण्याचे आदेश दिलेत. याबाबत काल गृह विभागाकडून शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून, या बंदीच्या यादीत इस्लामिक स्टेट म्हणजेच आयसिस, अल-कायदा, हिज्ब-उल-मुजाहिदीन यांसारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित एकूण ११४ प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे.

मुंबई दहशतवादविरोधी पथकाच्या तपासात आणि ऑनलाइन हालचालींवर ठेवलेल्या लक्षातून काही डिजिटल माध्यमे, गुप्त ऑनलाइन चॅनेल्स आणि नेटवर्कच्या माध्यमातून जहाल विचारांचे साहित्य पसरवले जात असल्याचे समोर आले होते. या साहित्याच्या माध्यमातून तरुणांचे विचार बदलून त्यांना हिंसक कारवायांकडे वळवण्याचा धोका असल्याचे सरकारने नमूद केलंय. दहशतवादविरोधी पथकाच्या अप्पर पोलीस महासंचालकांनी १७ मार्च २०२६ रोजी राज्य सरकारकडे अहवाल सादर केला होता. देशाची सुरक्षितता, शांतता आणि नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारी काही पुस्तके, मासिके, कागदपत्रे, चित्रे, छायाचित्रे तसेच अन्य साहित्य जप्त करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली होती.

त्यानंतर गृह विभागाकडून कारवाई करत काल शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. गृह विभागाकडून हा आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशानुसार यादीतील पुस्तके, मासिके, कागदपत्रे, चित्रे आणि डिजिटल स्वरूपातील साहित्य जप्त केले जाणार आहे. जप्त करण्यात येणाऱ्या साहित्यामध्ये इस्लामिक स्टेट म्हणजेच आयसिसशी संबंधित 'व्हॉइस ऑफ खुरासान' या मासिकाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. हे मासिक 'अल अझाईम मीडिया'शी संबंधित असून, ते आयसिस, इस्लामिक स्टेट खोरासान प्रांत आणि आयसिस के यांसारख्या संघटनांशी जोडलेले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या मासिकाचे पहिल्या अंकापासून २६ व्या अंकापर्यंत तसेच त्यानंतरचे विविध अंक मिळून एकूण ४७ अंक जप्तीच्या कक्षेत आणण्यात आले आहेत. हिज्ब-उल-मुजाहिदीन आणि हिज्ब-उल-मुजाहिदीन पीर पंजाल रेजिमेंटशी संबंधित 'द रेव्होल्युशनरी रिसर्जन्स' या प्रकाशनाच्या ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२५ पर्यंतच्या विविध अंकांवरही बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय 'काश्मीर किफाह रेझिलियन्स अँड करेज' आणि 'द सोल ऑफ रेझिस्टन्स' यांसारख्या प्रकाशनांचाही जप्तीच्या यादीत समावेश आहे.

अल कायदाशी संबंधित प्रकाशनांवरही बंदी : अल कायदा आणि अल कायदा इन इंडियन सब कॉन्टिनेंट म्हणजेच एक्यूआयएसशी संबंधित 'नवाई गजवा-ए-हिंद' या प्रकाशनाचे जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२६ पर्यंतचे विविध अंकही जप्त केले जाणार आहेत.



सरकारने केवळ दहशतवादी विचारांचा प्रचार करणाऱ्या साहित्यावरच नाही, तर प्रत्यक्ष हिंसक कारवायांसाठी वापरता येईल अशा तांत्रिक माहिती देणाऱ्या साहित्यावरही बंदी घातली आहे. यामध्ये स्फोटक पदार्थांची मूलभूत माहिती देणारे साहित्य, पेट्रोल बॉम्ब तयार करण्याची माहिती देणारी पुस्तकं, आत्मघाती रॉकेट तयार करण्याची माहिती देणारे साहित्य, हायड्रोजन पेरॉक्साइडवर आधारित रासायनिक स्फोटकांशी संबंधित साहित्य आणि मुजाहिदीन विषारी पदार्थ मार्गदर्शिका यांचा समावेश आहे.

सरकारने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारच्या साहित्याची छपाई करणे, विक्री करणे, वाटप करणे, सार्वजनिक ठिकाणी दाखवणे, साठवून ठेवणे किंवा ऑनलाइन माध्यमातून प्रसार करणे हे देशाची सुरक्षा आणि सार्वजनिक शांततेसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आता केवळ छापील पुस्तके आणि मासिकेच नव्हे, तर संकेतस्थळे, समाजमाध्यमे, गुप्त संदेशवहन प्रणालीवरील चॅनेल्स आणि इतर डिजिटल माध्यमांवरून होणाऱ्या प्रसारावरही कारवाई केली जाणार आहे.

## महत्त्वाचे...

### महिनाभरातच नवी ई-बस बंद; ट्रॅक्टरला बांधून डेपोकडे नेण्याची वेळ, व्हिडिओ व्हायरल



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड । प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील देगलूर आगारासाठी अवघ्या महिनाभरापूर्वी दाखल झालेल्या पाच नवीन इलेक्ट्रिक बसपैकी एक बस अचानक बंद पडल्याने तिला ट्रॅक्टरला बांधून डेपोकडे ओढत नेण्याची वेळ आली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नव्या ई-बसच्या गुणवत्तेबाबत आणि देखभाल व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

राज्य परिवहन महामंडळाकडून पर्यावरणपूरक, प्रदूषणमुक्त आणि अत्याधुनिक सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या इलेक्ट्रिक बस देगलूर आगारात दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, अवघ्या एका महिन्यातच त्यापैकी एक बस तांत्रिक बिघाडामुळे रस्त्यात बंद पडल्याने ती ट्रॅक्टरच्या सहाय्याने डेपोकडे नेण्यात आली.

या घटनेमुळे ई-बसच्या दर्जाबाबत आणि देखभालीच्या कार्यक्षमतेबाबत नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, बसमध्ये नेमका कोणता तांत्रिक बिघाड झाला, तसेच ती ट्रॅक्टरने का ओढावी लागली, याबाबत देगलूर आगार प्रशासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे या प्रकाराची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### मराठी भाषा विभागाच्या सात संकेतस्थळांचे नव्या डोमेनवर स्थलांतर पूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव । प्रतिनिधी :** मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या एकूण सात संकेतस्थळांचे चरहरश्रढ मार्फत हस्तांतरण पूर्ण झाले असून, महाराष्ट्र शासनाच्या मानक डोमेन संरचनेनुसार ारहरीरीहीर.सीें.ळप या डोमेनवर सर्व संकेतस्थळे नियमितपणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान आवश्यक प्रणालीगत बदल करण्यात येत असल्याने संबंधित सात संकेतस्थळे तात्पुरती अनुपलब्ध होती. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खालील संकेतस्थळे नव्या डोमेनवर उपलब्ध झाली आहेत.

१. मराठी भाषा विभाग – https://marathi.maharashtra.gov.in

२. भाषा संचालनालय – https://directorate-marathi.maharashtra.gov.in

३. राज्य मराठी विकास संस्था – https://rmvs-marathi.maharashtra.gov.in

४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ – https://sahitya-marathi.maharashtra.gov.in

५. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ – https://marathivishwakosh.maharashtra.gov.in

६. विश्वकोश प्रथमावृत्ती (१ ते २० खंड) – https://vishwakosh-marathi.maharashtra.gov.in

७. मराठी परिभाषा कोश – https://shabdakosh-marathi.maharashtra.gov.in

सर्व नागरिक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, साहित्यिक, साहित्यप्रेमी, शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच सर्व संबंधितांना या नव्या संकेतस्थळांची माहिती व्हावी व त्यांचा वापर करावा, असे आवाहन मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले यांनी केले आहे.

### भाजपाने मोहन भागवत यांचे ऐकावे, भाजपा-आरएसएसमधील विरोधाभास उघड, अभिजीत दिपकेंनी सुनावले

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** भाजपा पक्षाच्या नेत्यांनी आता मोहन भागवत यांचं ऐकलं पाहिजे. विद्यार्थी करत असलेले आंदोलन त्यांचा अधिकार असून, त्यांचे विषय गंभीर आहेत. त्यांना देशद्रोही म्हणणं योग्य नाही असे ते म्हणत असल्यानं भाजपा आणि संघ यांच्यात विरोधाभास दिसून येत आहे. मोहन भागवत यांनी एकदा भाजपसोबत बोललं पाहिजे, अशी मागणी कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी केली. सोशल मीडियावर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माझे अनेक खोटे व्हिडिओ प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तपास केला तर आयटी सेलमधून हे घडल्याचं उघडकीस येईल, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

## वृत्तविशेष...

### शासकीय तंत्रनिकेतन खामगाव येथे ११ ऑगस्टला अतिरिक्त प्रवेश फेरी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या चार फेऱ्यांनंतर संस्थेत रिक्त राहिलेल्या जागांसाठी अतिरिक्त प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली आहे. ही प्रवेश फेरी शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव येथे मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येणार आहे.

या प्रवेश फेरीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक मूळ प्रमाणपत्रे आणि विहित शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वी अन्य संस्थेत प्रवेश घेतलेला असल्यास संबंधित विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी Proforma-N सादर करणे आवश्यक आहे.

दि. ११ ऑगस्टच्या फेरीनंतरही जागा शिल्लक राहिल्यास दि. १३ व १४ ऑगस्ट २०२६ रोजी उर्वरित जागांसाठी अंतिम अतिरिक्त प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. रिक्त जागांचा तपशील तसेच विहित शुल्काची माहिती शासकीय तंत्रनिकेतन खामगावच्या www.gpk.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य तथा प्रथम वर्ष प्रवेश समितीने केले आहे.

### खामगाव आयटीआयमध्ये ९ व 10 ऑगस्टला समुपदेशन प्रवेश फेरी; इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : सतगुरू अगाशे काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव येथे शिल्पकार प्रशिक्षण योजनेंतर्गत ऑगस्ट २०२६ प्रवेश सत्रासाठी समुपदेशन प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली आहे. संस्थेतील विविध व्यवसायांमध्ये एकूण ५९ जागा रिक्त असून इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य व्ही. व्ही. काळे यांनी केले आहे.

या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन नोंदणी केलेले, मात्र अद्याप प्रवेश न मिळालेले सर्व उमेदवार पात्र राहणार आहेत. उमेदवारांनी ९ व १० ऑगस्ट २०२६ रोजी आपल्या प्रवेश खात्यातून ऑनलाइन हजेरी नोंदविणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणी किंवा हजेरी नोंदविताना अडचण आल्यास जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी संपर्क साधावा.

समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी ११ ऑगस्ट २०२६ रोजी ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार ऑनलाइन नोंदणी व हजेरी पूर्ण केलेल्या उमेदवारांनी १२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.

गुणवत्ता यादीनुसार रिक्त जागांवर १२ व १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत नियमानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. समुपदेशन फेरीत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी निर्धारित कालावधीत ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करून संस्थेत वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार, मुकादमाच्या मुलावर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात एक संतापजनक घटना घडली आहे. पाथर्डी तालुक्यातील एका गावातील साडेतेरा वर्षीय अल्पवयीन मुली-चे अपहरण करून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे पाथर्डी तालुक्यात एकच खळबळ उडाली असून संतापाची लाट पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित मुलीचे आई-वडील ऊसतोड मजूर असून ते हंगामी कामासाठी बाहेरगावी जात असल्याची माहिती आहे. ऊसतोडीसाठी कामगार पुरविणाऱ्या मुकादमाच्या मुलाची पीडितेशी ओळख झाली होती. संधीचा फायदा साधून मार्च २०२६ मध्ये आरोपीने पीडित मुलीला घरातून जबरदस्तीने घेऊन जाऊन एका ठिकाणी डांबून ठेवले. त्यानंतर पुणे जिल्ह्या-तील शिरूर तालुक्यातील न्हावरा येथे नेऊन जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दरम्यान, १ ऑगस्ट रोजी पीडित मुलीने एका अनोळखी महिलेच्या मोबाईलवरून आईशी संपर्क साधला. आपण न्हावरा येथे असल्याची माहिती मोबाईलवरून आईला दिली. त्यानंतर २ ऑगस्ट रोजी पीडितेच्या आई-वडीलांनी न्हावरा गाठले आणि मुलीला घरी घेऊन आले. घरी आल्यानंतर मुलीने आपल्या आईला आपली आपबिती सांगितली. यानंतर पालकांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी संशयित आरोपी धनंजय आठरे याच्याविरुद्ध बलात्कारासह पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

# लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण करा- जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे

दैनिक आपला विदर्भ




**१ लाख १६ हजार ४३६ पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर**

---

**८२ हजार ६२७ शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण**

**बुलढाणा । प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना२०२६ अंतर्गत १ लाख १६ हजार ४३६ पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यापैकी ८२ हजार ६२७ शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण झाली असून ३३ हजार ८०९ शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रलंबित आहे. त्यामुळे योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले.

कर्जमुक्ती योजनाची पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सुमारे २ लाख २७ हजार ६४६ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्येही प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रत्येक पात्र लाभार्थ्याच्या कर्ज खात्याला विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. त्याआधारे ॲग्रीस्टॅकवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांना आपल्या पात्रतेबाबत अथवा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात काही तक्रार अथवा शंका असेल, त्यांनी जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार नोंदवावी. तसेच अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक ०२२-४९१५०८०२ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

विशेष सवलत (हेअर कट) : शेतकऱ्यांचे कर्जखाते अनुत्पादित (एनपीए) झाले असल्यास, नॅशनल बँकांना थकीत कालावधीच्या टप्प्यानुसार विशेष सवलत (हेअर कट) दिली जाणार आहे. त्याची तडजोड रक्कम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर २०२१ किंवा त्यापूर्वी कर्जबाकीच्या ३५ टक्के, १ ऑक्टोबर २०२१ ते ३० सप्टेंबर २०२२ - कर्जबाकीच्या ४५ टक्के, दि. १ ऑक्टोबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२३ - कर्जबाकीच्या ५५ टक्के, १ ऑक्टोबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ कर्जबाकीच्या ७० टक्के आणि १ ऑक्टोबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत कर्जबाकीच्या ८५ टक्के केली जाणार आहे. सदर विशेष सवलत हे नॅशनल बँकेना लागू राहणार आहे.

## पवित्र पोर्टलद्वारे ३० हजार २०९ शिक्षक पदांची भरती; उमेदवारांना ६ ते ११ ऑगस्टदरम्यान पदनिहाय पसंतीक्रम लॉक करण्याची संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : राज्यातील शासकीय तसेच खासगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेंतर्गत विविध व्यवस्थापनांच्या एकूण ३० हजार २०९ रिक्त शिक्षक पदांची जाहिरात प्राप्त झाली आहे. पात्र उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर लॉगिन करून पदनिहाय पसंतीक्रम नोंदवून तो दि. ६ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत लॉक करणे आवश्यक आहे.




प्राप्त जाहिरातीतील रिक्त पदांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वीच्या १४ हजार ३२०, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या १० हजार १२, इयत्ता ९ वी ते १० वीच्या ५ हजार ५१३ आणि इयत्ता ११ वी ते १२ वीच्या ३६४ पदांचा समावेश आहे. विविध व्यवस्थापनांकडून प्राप्त जाहिरातींमध्ये शासकीय शाळा, शासकीय विद्यानिकेतन, खासगी शैक्षणिक संस्था तसेच नगर पालिका/परिषदा, महानगरपालिका आणि आदिवासी विकास विभागांतर्गत रिक्त पदांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीनुसार, नगर पालिका/परिषदांकडील २८०, महानगरपालिकांतील १ हजार ९५४ आणि आदिवासी विकास विभागातील २ हजार ४२१ पदांचा समावेश आहे.

पसंतीक्रम लॉक करणे आवश्यक : पदभरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना पोर्टलवर प्राधान्यक्रम नमूद करण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, संबंधित उमेदवारांना SMS द्वारेही माहिती देण्यात येत आहे. उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर लॉगिन करून पदनिहाय पसंतीक्रम नोंदवावा आणि दिलेल्या मुदतीत तो लॉक करावा. उमेदवारांची प्राधान्यक्रमाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीशिवाय या प्रकारातील गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पदभरती प्रक्रियेबाबत उमेदवारांना काही म्हणणे, मागणी किंवा सूचना असल्यास त्यांनी edupavitra25gmail.com या ई-मेलवर पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त बाबींची योग्य ती दखल घेण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

## अवयवदानासाठी नागरिकांनी पुढे यावे; बुलढाण्यात जनजागृती अभियान

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : अवयवदान पंधरवडा २०२६ निमित्त जिल्हाभर जनजागृती उपक्रमांना वेग आला असून शुक्रवारी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय तसेच बुलढाणा बस स्थानक येथे अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नागरिकांना अवयवदानाचे महत्त्व पटवून देत ऑनलाइन प्रतिज्ञा नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात पोलीस अधीक्षक, जिल्हा कोषागार अधिकारी तसेच बस स्थानक प्रमुख रामकृष्ण पवार यांची भेट घेऊन अवयवदानाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. समाजात अवयवदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून मृत्युपश्र्चात अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना क्यूआर (ठ) कोड स्कॅन करून ऑनलाइन अवयवदान प्रतिज्ञा नोंदणी करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष दाखविण्यात आली. अधिकाधिक नागरिकांनी स्वेच्छेने अवयवदानाचा संकल्प करून या जीवनदायी चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेश धुतडमल तसेच नेत्र समुपदेशक योगेश शिरसाट यांनी उपस्थितांचे समुपदेशन करत अवयवदानाचे सामाजिक आणि मानवी मूल्य अधोरेखित केले. कार्यक्रमास संबंधित कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी, वाहन चालक, बस स्थानकावरील कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

अवयवदान हा मृत्यूनंतरही दुसऱ्याला नवजीवन देणारा सर्वोच्च मानवतावादी संकल्प आहे. चला, आपणही अवयवदानाचा संकल्प करूया, असा संदेश देत उपस्थितांना अवयवदानासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# सामूहिक तेलबिया पीक प्रात्यक्षिकांतर्गत शेतकरी प्रशिक्षण व शेती शाळा संपन्न

## नागापूर येथे सोयाबीन व्यवस्थापनावर मार्गदर्शन; प्रक्षेत्र भेटीतून शेतकऱ्यांच्या समस्यांचे निरसन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** :डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगाम २०२६ अंतर्गत सामूहिक तेलबिया पीक प्रात्यक्षिक, शेतकरी प्रशिक्षण, चर्चासत्र तसेच प्रक्षेत्र भेटीचे आयोजन नागापूर (ता. मेहकर) येथे करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) अंतर्गत शेती शाळेचा तिसरा वर्गही घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र, बुलढाण्याचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे होते. मार्गदर्शन करताना त्यांनी सोयाबीन पिकाच्या व्यवस्थापनात उत्पादनवाढीसोबत मृदा आरोग्य सुधारण्यावरही भर देण्याचे आवाहन केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या जैविक निविष्ठांचा शास्त्रोक्त वापर केल्यास जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास तसेच उत्पादनक्षमता वाढविण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या पीकविषयक विविध शंकांचे निरसन करून आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले.

मंडळ कृषी अधिकारी राजूरकर, उपकृषी अधिकारी धांडे, सहाय्यक कृषी अधिकारी जंजाळ, तंत्र अधिकारी विजय सरोदे तसेच समूह सहाय्यक अजय खराटे यांनी तेलबिया पिकांचे व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि विविध शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला नागापूरच्या सरपंच कल्पनाबाई समाधान गायकवाड, कृषी सखी चैताली धाबे, महिला बचत गटांच्या सदस्यांसह प्रगतिशील शेतकरी व महिला शेतकऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. कृषी विज्ञान केंद्र, बुलढाण्याचे विषय विशेषज्ञ डॉ. वाडकर यांनी सामूहिक पीक प्रात्यक्षिकाच्या उद्दिष्टांची माहिती दिली. गावस्तरावर पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. सामूहिक पद्धतीने आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादन वाढीसोबतच उत्पादन खर्चात बचत आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळण्यास मदत होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत आयोजित शेती शाळेच्या तिसऱ्या वर्गामध्ये शेतकऱ्यांना सोयाबीन पिकातील मर रोग व चक्रीभुंगा या प्रमुख कीड-रोगांची ओळख, व्यवस्थापन आणि नियंत्रणाच्या उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. पिकांची नियमित पाहणी करून आर्थिक नुकसान पातळी लक्षात घेऊनच आवश्यकतेनुसार कीडनियंत्रणाच्या उपाययोजना व फवारणी करावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच प्रत्यक्ष शेतामध्ये पीक निरीक्षण कसे करावे, याचे प्रात्यक्षिकही शेतकऱ्यांना देण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान कृषी शास्त्रज्ञ व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रांना भेट देऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पिकांमध्ये उद्भवलेल्या समस्यांवर शास्त्रोक्त उपाय सुचविण्यात आले. प्रत्यक्ष शेतावर मिळालेल्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांनी विविध शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमास गणेश धाबे, पवन धाबे, सुधाकर धाबे, विलास धाबे, नंद गायकवाड, समाधान गायकवाड, नंदकिशोर किल्लारी, इलियास खान यांच्यासह नागापूर गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा तसेच गावातील शेतकरी बांधवांनी सहकार्य केले.